**Satara Vipassana Samiti**
Office Address , R/o. 27, Utkarsh, Kanga Colony,
Sadar Bazar, Satara 415001.
Email-sataravipassanasamiti@gmail.com Mobile No.- 9922992874
Date - 29/06/2026

Reg No.- E-0002518 (Satara)

प्रति,
माननीय प्राचार्य सो,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) फलटण,
ता. फलटण जिल्हा सातारा.

मा. महोदय,
**विषय:** जुलै २०२६ च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत.

**संदर्भ:** १) जा.क्र. राज्यशैप्रम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/दिनांक २९ मे २०२६.
२) जा.क्र. आ.शि./ स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दिनांक ८ ऑगस्ट २०१९.

मा.महोदय,
कृपया वरील संदर्भीय विषयानुसार जुलै २०२६ महिन्यातील केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासांचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी यांनी मित्र उपक्रमांतर्गत शिक्षकांना आनापान साधनांचे प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. त्यानंतर ते शिक्षक आपापल्या गावात मित्र उपक्रम अंमलबजावणी करू शकतील.

मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिक्षण परिषदेच्या पूर्वी मित्र प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. सातारा जिल्ह्यात सातारा विपश्यना समितीतर्फे मित्र उपक्रम टीमकडून केंद्र प्रमुख तसेच इतर वरिष्ठ शिक्षण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

आपल्या सोयीप्रमाणे सातारा जिल्ह्यात योग्य व मध्यवर्ती ठिकाणी सर्व केंद्रप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी एक किंवा दोन कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात आणि त्यात सर्व केंद्रप्रमुख व इतर जिल्हा व तालुका स्तरीय अधिकाऱ्यांना सहभागी होण्याचे आदेश निर्गमित करावे ही विनंती. त्यासाठी लागणारी सर्व व्यवस्था ही केली जावी. प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी सातारा विपश्यना केंद्रांतर्फे आम्ही पूर्ण सहकार्य करू.

धन्यवाद,

अध्यक्ष
दिलीप उटकुर (9922992874)
सातारा विपश्यना समिती

**संपर्कासाठी फोन:**
१.संजय भोसले (कराड) - 9422606322, २. विशाल कांबळे (सातारा) 9922638271, ३. उद्धव भस्मे (सातारा) 9850893162

**माहितीसाठी प्रत:**
१. मा. शिक्षण अधिकारी प्राथमिक
२. मा. शिक्षण अधिकारी माध्यमिक
३. मा शिक्षण अधिकारी योजना

Scanned with OKEN Scanner